**कृपया प्रसिध्दीसाठी -** **9 जून 2009**

## 'व्यवस्थापन गुरु' श्री.लालू प्रसाद यांनी जाता-जाता आपल्या रेल्वे प्रवासाची सुविधा वाढविली : राम नाईक

**मुंबई, मंगळवार :** रेल्वे मंत्री पद सोडावे लागणार हे स्पष्ट झाल्यानंतर जाता-जाता 'व्यवस्थापन गुरु' माजी रेल्वे मंत्री श्री.लालू प्रसाद यांनी आपल्या कुटुंब-कबिल्याच्या रेल्वे प्रवासाची कायमस्वरुपी सोय केली आहे, अशी धक्कादायक माहिती माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांनी आज दिली आहे.

लोकसभा निवडणुकींचा निकाल 16 मे रोजी लागल्यानंतर लगेचच श्री.लालू प्रसाद यादव रेल्वे मंत्री राहू शकणार नाहीत हे स्पष्ट झाले होते. 22 मे रोजी नव्या मंत्रीमंडळाचा शपथविधी झाला. त्याच्या अवघे तीन दिवस आधी म्हणजे 19 मे रोजी 'व्यवस्थापन गुरु' श्री.लालू प्रसाद यांनी आदेश काढून स्वतःसाठी रेल्वे प्रवासाची नवी योजना कार्यान्वित केली आहे. या आदेशानुसार सर्व माजी रेल्वे मंत्र्यांना तहहयात वातानुकुलीत प्रथम श्रेणीचा तीन व्यक्तिंसह प्रवास करता येणार आहे. एवढेच नव्हे तर त्यांचा सेवकही (अटेंडंट) वातानुकुलीत व्दितीय श्रेणीने प्रवास करु शकणार आहे. "एवढ्या मोठ्या सवलतीची गरज काय ?" असा सवाल श्री.राम नाईक यांनी केला असून मंत्रीपद जात असताना केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी केलेला हा निर्णय नीतीमत्तेला आणि संसदीय परंपरांना धरुन नाही असे मत व्यक्त केले आहे.

निवडणुक काळातील मंत्र्यांच्या निर्णयांवर नव्याने पदग्रहण करणा-या मंत्र्यांनी पुनर्विचार करण्याची पध्दत आहे. त्यानुसार रेल्वे मंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी श्री.लालू प्रसाद यांचा हा निर्णय रद्द करावा, अशी मागणीही श्री.राम नाईक यांनी केली आहे.

**(कार्यालय सचिव)**